अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यातील खाजगी संस्थाना औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यासाठी परवानगी देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. पीईसी -२००६/( ४७४/०६)/तांशि-१,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- ४ ऑक्टोबर, २००६

संदर्भ :- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद,नवी दिल्ली यांचे दि. १०.८.२००६ व ११.८.२००६ चे पत्र.

**शासन निर्णय :-** अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधीन पत्रान्वये सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षात राज्यातील खालील संस्थाना औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाची संस्था सुरू करण्यास परवानगी दिलेली आहे. त्यास अनुसरून याबाबत शासन आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|
| १ | हंसाबाई गेहलोत चॅरिटेबल ट्रस्टचे गेहलोत इस्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज ॲण्ड रिसर्च,,प्लॉट नं.५९,सेक्टर १४,कोपरखैरणे,नवी मुंबई | बी.फार्मसी | ६० |
| २ | के.बी.एच. एस.एस ट्रस्टचे इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी,मालेगांव कॅम्प,कृषि नगर,नाशिक | बी.फार्मसी | ६० |

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या सदर मान्यतेच्या अनुषंगाने शासनाचे आदेश निर्गमित होणे आवश्यक आहे. तथापि, रिट याचिका क्र.३९१६/२००१, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली विरुध्द महाराष्ट्र शासन या याचिके संदर्भात दि.१७.९.२००१ रोजी देण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने दि.३० जून, २००६ नंतर अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून मान्यता प्राप्त प्रस्तावांना पुढील शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता देण्यात येते.

शासनाच्या वरील धोरणानुसार सदर संस्थांची मान्यता ३० जून नंतर प्राप्त झालेली असल्याने सदर संस्थेचा विचार सन २००६ च्या प्रवेशार्करिता करण्यात न आल्याने सदर संस्थानी मा.उच्च न्यायालय मुंबई येथे रिट यचिका क्र.५५३८/२००६ व ५५३२ /२००६ दाखल केल्या होत्या. या याचिकांवर दि. १८.८.२००६ रोजी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार सदर संस्थांचा

K.B.H.S.S. TRUST'S INSTITUTE OF PHARMACY MALEGAON CAMP

K.B.H.S.S. TRUST'S INSTITUTE OF PHARMACY MALEGAON CAMP

57

समावेश दुस-या फेरीमध्ये करण्यात आलेला आहे.त्यानुषंगाने उपरोक्त संस्थाना मा. उच्च न्यायालय मुंबई,यांच्या आदेशानुसार शैक्षणिक वर्ष २००६-०७ पासून औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाची संस्था सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर मान्यता ही खालील अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दि. २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटीची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्राची आणि औपचारिक बाबींची पूर्तता तंत्रशिक्षण संचालकाच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

३) सदर अभ्यासक्रमासाठीच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील तरतूदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता / संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक, तंत्रशिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाने / संस्थेने त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष पूर्ण होण्यापूर्वी फार्मसी ॲक्ट १९४८ च्या कलम १२ मधील तरतूदीनुसार फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची विहित मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहिल.

६) सदर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार / पध्दतीनुसार करण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( स्मिता द. निवतकर )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव,पुणे विद्यापीठ, पुणे
मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव
संबंधित संस्थां
निवडनस्ती /तांशि-१

प्रत – सल्लागार (यू.जी.) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी खेल परिसर, इंद्रप्रस्थ इस्टेट, नवी दिल्ली ११० ००२.

विभागीय अधिकारी, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रीयल इनशुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई ४०० ०२०.